## I. सुरक्षा अनामत रक्कम व करारनामा-

१. शासनाच्या खरेदी नियमावलीप्रमाणे ज्यांच्या निविदा मंजूर होतील त्यांना विहीत मुदतीत पेपर पिशवीचा पुरवठा करावयाची हमी म्हणून एकुण पुरवठा आदेश रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून श्री साईबाबा संस्थानकडे ठेवावी लागेल निविदा मंजुर झाल्याचे कळविलेनंतर सदर रकमेचा भरणा करावा लागेल. ही सुरक्षा अनामत रक्कम व्यवस्थितरित्या पेपर पिशवीचा पुरवठा पूर्ण केलेनंतर परत केली जाईल. सुरक्षा अनामत अगर बयाणा रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

२. निविदा मंजुर झालेनंतर ३% सुरक्षा अनामत रक्कम भरावी लागेल. तसेच शिर्डी येथे समक्ष येऊन रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर त्वरित करारनामा नोटरी करुन देणे बंधनकारक राहील. करारनाम्याची नोटरी फी निविदाधारकास आदा करावी लागेल.

## J. पेपर पिशवी पुरवठा करण्याचा कालावधी -

१. पेपर पिशवी पुरवठा करण्याचा कालावधी १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३ असा राहिल.

२. पेपर पिशवी मागणी चलनात दिलेले Schedule प्रमाणे अगर चलन दिलेपासून जास्तीत जास्त १० दिवसात पुरवठा करावा लागेल. प्रसंगी दुरध्वनीवरून कळविलेवरही पुरवठा करावा लागेल.

३. शिर्डी येथे दर्शनासाठी भेट देणा-या साईभक्तांच्या गर्दीवर हि सेवा अवलंबुन असलेमुळे प्रत्येक महिन्यात/अगर कमी जास्त मुदतीत अगर श्री साईबाबा संस्थानचे धोरणानुसार गरजेप्रमाणे पेपर पिशव्यांची मागणी केली जाईल. एकदम सर्व पेपर पिशव्या घेतल्या जाणार नाहीत. श्री साईबाबा संस्थानचे खरेदी चलनाप्रमाणे वेळोवेळी पिशवीचा पुरवठा करावा लागेल. तसेच मागणीपेक्षा जादा आलेल्या पिशव्या स्विकारल्या जाणार नाहीत.

४. श्री साईबाबा संस्थानची सदर मागणी ही अंदाजित असल्यामुळे पुरवठा कालावधीत अगर त्यानंतरही पुढील वर्षाची खरेदी संबंधीत प्रक्रिया पुर्ण होईपावेतो गरजेनुसार मंजुर केलेल्या परिमाणापेक्षा २५ टक्केपर्यंत जादा पिशव्यांची आयटेमवाईज मागणी श्री साईबाबा संस्थानकडून झाल्यास त्या पिशव्यांचा पुरवठा मान्य दरानेच करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील. तसेच पुरवठा आदेशामध्ये नमुद केलेल्या परिमाणाइतक्या पूर्ण पिशव्या घेणे श्री साईबाबा संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.

## K. पेपर पिशव्यांचा स्वीकार करण्याची पध्दत-

१. पुरवठा आदेशातील वर्णनाप्रमाणेच पिशव्यांचा पुरवठा करावा व त्याप्रमाणेच पिशव्यांचे बिल सादर करावे.

२. ज्या निविदा मंजूर होतील त्यांना सर्व पिशव्या मान्य झालेल्या दर्जा व नमुन्याप्रमाणे पुरवाव्या लागतील. कमी दर्जाच्या अगर वेगळ्या प्रकारच्या किंवा खराब पिशव्या स्वीकारल्या जाणार नाहीत. अशा पिशव्या पुरवठा झाल्यास त्या स्वखर्चाने तात्काळ परत घेऊन जाणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. त्या न नेल्यास, त्यांची नासधूस झाल्यास त्यास श्री साईबाबा संस्थान जबाबदार राहणार नाही.

३. पुरवठाधारकाला पुरवठा आदेश दिलेनंतर निविदेसोबत सादर केलेल्या कागदाच्या नमुन्याप्रमाणेच पिशव्या पुरवणे बंधनकारक राहिल.

४. पुरवठा आदेशाप्रमाणे श्री साईबाबा संस्थानकडे पिशव्या पाठविल्यानंतर श्री साईबाबा संस्थानने विहीत केलेले यंत्रणेकडून त्यांची तपासणी केली जाईल. त्यांना योग्य वाटल्यास पिशव्या स्वीकारण्यात येतील. पुरवठाधारकांनी दिलेल्या कागदाच्या दिलेले नमुन्याप्रमाणे तोच कागद वापरुन पिशव्या पुरविण्याची दक्षता घ्यावी.

STATEMENT SHOWING PURCHASE OF PAPER BAGS FOR THE YEAR 2022-23

BOQ

| Sr.No. | Description | Quantity | Unit | Rate Per Quintal | Total Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Size 4.5"x 6.5" Poster Laminated Plain Paper Bags, 70 GSM, 2 Side Seal | 130 | Quintal | | |
| 2 | Size 6"x 7" Poster Laminated Paper Bags with **Barcode**, Prasad, 70 GSM, 4 Colour Printing, 2 Side Seal | 600 | Quintal | | |
| 3 | Size 5"x 6" Poster Laminated Paper Bags with **Barcode**, Prasad, 70 GSM, 4 Colour Printing, 2 Side Seal | 400 | Quintal | | |
| 4 | Size 8"x 10", 1 Colour Printing, Poster Laminated Paper Bags, 70 GSM, 2 Side Seal, Food Packet | 350 | Quintal | | |
| 5 | Size 8"x 10", 1 Colour Printing, Poster Laminated Paper Bags, 70 GSM, 2 Side Seal, Shri Sai Satyavrat Prasad | 10 | Quintal | | |
| 6 | Poster Laminated Paper Bags, 70 GSM, 2 Side Seal, Plain, Size 8"x 10" | 3 | Quintal | | |

(Bhagyshree Banayat.I.A.S)

Chief Executive Officer

Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi

23/12 21/12/2022